# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## बहिस्थ शिक्षण विभाग २०२३—२०२४

---

### बहिस्थ शिक्षण एम.ए.व एम.कॉम. व्दितीय वर्ष प्रकल्प प्रबंधिकालेखन

#### प्रकल्प कार्याची उद्दिष्टे

१. अध्ययनप्रक्रियेत विद्यार्थ्यांची भूमिका केवळ अक्रियाशील श्रोत्यांची (**Passive Listeners**) न राहता ती कृतिशील भागिदारांची ( **Active Participants** ) असली पाहिजे. ज्ञानार्जनप्रक्रियेत सक्रियपणे सहभागी झाले पाहिजेत.

२. अभ्यास विषयाचा आपल्या समाजजीवनाशी, परिसराशी कोणता संदर्भ व अन्वय आहे हयाचा शोध विद्यार्थ्यांना घेता यावा व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक पातळीवर संवाद निर्माण व्हावा.

३. विद्यार्थ्याच्या अवलोकन आणि आकलनशक्तीत वाढ व्हावी आणि वस्तुनिष्ठ विचार करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण व्हावी.

४. सामाजिक,आर्थिक आणि एकंदर जीवनविषयक प्रश्नाबद्दल जिज्ञासा विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावी.

५. विद्यार्थ्यांना त्यांच्या निरिक्षणातून, अवलोकनातून , वाचनातून, चर्चेतून, सर्वेक्षण आणि कार्यानुभवातून ही आकलन होते. त्याची स्वतःच्या' शब्दात मांडणी करता यावी. परिणामतः त्यांची स्वतःची लेखनक्षमता व लेखनकौशल्य विकसीत व्हावीत.

६. विद्यार्थ्याच्या अंगी विश्लेषण व संश्लेषण क्षमतांचा विकास व्हावा व त्यांना विवेचकदृष्टी प्राप्त व्हावी.

७. विद्यार्थ्याच्या ठायी असणाऱ्या कल्पकता, सर्जनशीलता, तर्कशक्ती इत्यादी सूप्त गुणांच्या विकासासाठी व त्यांच्या अभिव्यक्तीसाठी संधी मिळावी.

८. वरील सर्व गुणसमुच्चयामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात भर पडावी आणि पर्यायाने त्यांचे बौध्दिक व्यक्तिमत्त्व विकसित व्हावे.

## प्रकल्पकार्य विषयाची निवड व नोंदणी

१. एखाद्या विद्यार्थ्याने निवडलेल्या प्रकल्पकार्य विषयाची पुनरावृत्ती होता कामा नये. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र विषय दिला पाहिजे.

२. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या प्रकल्पकार्य विषयांची यादी विद्यार्थ्यांच्या सूचना फलकांवर प्रसिध्द करण्यात यावी व त्याची एक प्रत बहिस्थ शिक्षण विभागास पाठविण्यात यावी.

३. प्रकल्पविषय निवडला जात असताना विद्यार्थ्यांची आवड, परिसराची आवश्यकता, अभ्यास सामुग्रीची उपलब्धता इ. बाबी लक्षात घेऊन विषय निश्चित करावा.

४. विद्यार्थ्याचे प्रकल्प विषय निश्चित करताना त्या त्या विषयाच्या सर्व समंत्रकांनी आपापल्या सहकार्यांशी चर्चा करून प्रकल्प विषय द्यावेत. हया संबंधिचे नियंत्रण संबंधीत महाविद्यालयांच्या अभ्यासकेंद्र समन्वयकांनी व केंद्रप्रमुखांनी करावे.

५. प्रकल्प कार्यात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याला त्याच विषयावर पुन्हा प्रकल्प प्रबंधिका उत्तीर्ण होण्यासाठी अभ्यास केंद्रामार्फत विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे.

६. व्दितीय वर्षात प्रवेश घेतल्यानंतर शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला प्रकल्पकार्य—शीर्षक ठरवून दिलेल्या विद्यर्थ्याची नोंदवही (रजिस्टर) शाखानिहाय अभ्यासकेंद्रावरच ठेवावी व या नोंदवहीत अ क्र. विद्यार्थ्याचे नाव, शाखा, प्रकल्पकार्याचे शीर्षक, मार्गदर्शक प्राध्यापकांचे नाव, त्यांची स्वाक्षरी व विद्यार्थ्याची स्वाक्षरी अशाप्रकारचा तक्ता असावा.

७. विषयनिवडीसंदर्भात लवचिकता असावी. म्हणजेच विषयनिवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यात यावे. तथापि, संबंधीत मार्गदर्शक प्राध्यापकाने विद्यार्थ्याची आंवड लक्षात घेऊन त्याला विषय निश्चित करून देण्यास मदत करावी.

८. विद्यार्थ्याने प्रबंधिका **स्वःच्या हस्ताक्षरात** लिहावी. ही प्रबंधिका विद्यार्थ्यानेच लिहिल्याचे प्रतिज्ञापत्र मार्गदर्शक समंत्रक व केंद्र संचालक यांनी प्रमाणित करावे.

९. विद्यापीठाच्या नमूना वही प्रमाणे प्रत्येक अभ्यासकेंद्राने आपल्या अभ्यासकेंद्रातील विद्यार्थिसंख्येच्या प्रमाणात अशा वहया छापून घेऊन विद्यार्थ्याकडून 'ना नफा ना तोटा' या तत्वावर शुल्क घेऊन विद्यार्थ्यांना वितरीत कराव्यात. विद्यापीठ बहिस्थ शिक्षण विभाग वहया पुरविणार नाही.

१०. बहिस्थ शिक्षण विभाग प्रकल्पकार्य संबंधात वेळोवेळी पाठविलेल्या परिपत्रकांचे अभ्यासकेंद्र प्रशासनाने अवलोकन करून या वहीत दिलेल्या सर्व सुधारित सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

११. प्रकल्पलेखन वही ही परीक्षा सुरू होण्याच्या तारखेपर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात जमा करण्यात याव्यात. परीक्षा सुरू झाल्याच्या तारखेनंतर सादर करण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रकल्पकार्य वहीसाठी रू. ५००/— विलंबशुल्क आकारण्यात येईल व तो दंड विद्यापीठात मा. वित्त व लेखाधिकारी, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांच्यानावे (NEFT/RTGS/D.D.) व्दारे जमा करावा लागेल.

१२. सर्व विद्यार्थ्यांची प्रकल्पविषय निवडलेली यादी ही अभ्यासकेंद्रानी प्रथम सत्राच्याशेवटी विद्यापीठात सादर करावी.

१३. प्रकल्पप्रबंधिका लेखन हे संशोधनावर आधारित असल्यामुळे स्वयंअध्ययन साहित्यातील मजकूर जशास तसा न घेता तो संकलीत केलेल्या तथ्यांवर आधारीत असून त्यामध्ये तथ्यांचे विश्लेषण व अर्थबोधन असावे.

## प्रकल्पांच्या पूर्वतयारीचा तपशील व सूचना

१ विषयाची निवड करताना विद्यार्थ्यांना पुरेशी संधी देण्यात यावी.

२ अशारितीने विद्यार्थी मानासिकदृष्टया तयार झाला म्हणजे. त्याचा कल, त्याची आवड निवड, अभ्यास सामुग्रीची उपलब्धता, ती जमविण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन त्यास प्रकल्पकार्य विषय निश्चित करण्यासाठी समंत्रक/ प्राध्यापकांनी मदत करावी.

३ पदव्युत्तर द्वितीय वर्षात प्रवेश घेतल्यानंतर प्रकल्पलेखनाचा कच्चा आराखडा तयार करावा. आराखडा तयार करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी आपल्या पातळीवर चालू ठेवावी.

४ प्रत्येक विद्यार्थ्यांना अभ्यासकेंद्रांनी रितसर मार्गदर्शक नेमून द्यावेत.

५ प्रत्येक विषयाच्या विद्यार्थ्यांनी त्यांना नेमून देण्यात आलेल्या मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे काम पूर्ण करावे.

६ प्रत्येक मार्गदर्शकांनी आपल्या विषयाच्या चौकटीतील विषय देऊन, तसेच प्रकल्पासाठी असलेल्या संशोधन पध्दतीचा अवलंब करण्याचा आग्रह धरावा.

७ विद्यार्थ्याला सहज शक्य होईल असे विषय देऊन, तसेच दिलेल्या विषय वैज्ञानिक, शास्त्रीयपध्दतीने कसे करून घेता येईल यावर लक्ष द्यावे.

८ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना प्रकल्पलेखनासाठी विषय देवू नये.' विषय देतानां विद्यार्थ्यांनी अभ्यासलेल्या विषयावरच असावा.

९ प्रकल्पातील मजकूर किंवा काही भाग हा स्वयंअध्ययन साहित्यातील असता कामा नये विद्यार्थ्यांनी सदर साहित्यातील भाग कॉपी करू नये.

## प्रकल्प प्रबंधिकालेखनाचा आराखडा

### प्रकल्पप्रबधिका लेखन व लेखनातील आवश्यक बाबी

(Format of the Project Dissertation )

१. मुखपृष्ठ : (Head/ Title Page )
२. मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र : (Certificate by Guide)
३. संशोधकाचे प्रतिज्ञापत्र : (Declaration by Researcher)
४. अनुक्रमणिका : (Index)
५. प्रस्तावना : (Introduction)
६. संशोधनपध्दती : (Research Methodology)
   i) उद्दिष्टे : (Objectives)
   ii) तथ्य संकलन : (Data Collection)
   iii) व्याप्ती व मर्यादा : ( Scope and Limitation
७. विषय विवेचन (तथ्य विश्लेषण व अर्थ बोधन)(Data Analysis & Interpretation)
८. सारांश : (Summary)
   i) निष्कर्ष : (Finding and Conclusions)
   ii) शिफारसी : (Recommendation)
९. संदर्भ ग्रंथ : (Referernces )
१०. परिशिष्ट : (Appendix )

वरील नमुद केलेल्या मुद्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याने आपले प्रकल्पलेखनकार्य पूर्ण करून पंचाहत्तर ते शंभर पृष्ठांपर्यंत असावा त्यावर मार्गदर्शक प्राध्यापक व अभ्यासकेंद्र प्रमुख (प्राचार्य) यांच्या स्वाक्षरी व शिक्यांसह प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या बहिस्थ शिक्षण विभागाच्या वार्षिक परीक्षा सुरू होण्याच्या तारखेपर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात जमा कराव्यात. परीक्षा सुरू झाल्याच्या तारखेनंतर सादर करण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रकल्पकार्य वहीसाठी रु. ५००/– विलंबशुल्क आकारण्यात येईल याची गाभीर्याने नोंद घ्यावी.

संचालक
बहिस्थ शिक्षण विभाग,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ,नांदेड